निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www.attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३१७ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * सोमवार दि.२३ मार्च २०२६ | * पाने-४


# हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरीचा विजेता!

## मानाच्या चांदीच्या गदेसह झाला मालामाल

**आत्ताच एक्सप्रेस**

पुणे - पुण्यातील वाघोळी येथे ६८व्या महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना खेळवला गेला. स्पर्धेचा अंतिम सामना हर्षवर्धन सदगीर आणि बाहुबली ओळख मिळवलेल्या महेंद्र गायकवाड यांच्यात खेळवण्यात आला. हर्षवर्धन सदगीरने महेंद्र गायकवाडवर ३ गुणांनी विजय मिळवला.

या विजयासह नाशिकचा कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर दुसऱ्यांदा विजेता ठरला. यासह डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा बहुमानही त्याने मिळवला आहे.

चुरशीच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने महेंद्र गायकवाडचा ४-३ अशा फरकाने पराभव केला. पुण्यातील या प्रतिष्ठेच्या लढतीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून होतं. सोलापूरचा महेंद्र गायकवाड म्हणजे आक्रमक अंदाजात खेळ करणं आणि हर्षवर्धनने मात्र या लढतीत आक्रमक आणि संयम खेळ यांचा अचूक मेळ साधला. यासह तो महेंद्र गायकवाडला टक्कर देत मानाची चांदीची गदा पटकावण्यात यशस्वी ठरला. हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला.

सहा मिनिटांच्या दोन फेऱ्या खेळवल्या गेल्या. त्यामधील पहिल्या फेरीत दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या फेरीतच गुणांची बरोबरी झाली होती. दुसऱ्या फेरीत दोघेही आक्रमक झाले होते. दोन्ही पैलवानांना इशारा दिला गेला. यानंतर शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत सदगीरने आघाडी मिळवली. गायकवाडनेही अखेरील तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने हर्षवर्धनने निसटता विजय मिळवला. रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांच्या आयोजनाखाली पार पडलेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत विजेत्या हर्षवर्धन सदगीरला मानाची चांदीची गदा, ५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि फॉर्च्युनर गाडी देण्यात आली आहे. तर उपविजेत्या महेंद्र गायकवाडला स्कॉर्पिओ आणि चार लाखांचे रोख पारितोषिक देण्यात आलं आहे. महाराष्ट्र केसरीमध्ये गादी विभागात हर्षवर्धन सदगीर याने जय पाटीलचा पराभव करत अंतिम फेरी गाठली होती. तर माती विभागात महेंद्र गायकवाड आणि सिकंदर शेख या दोन तगड्या पैलवानांमध्ये लढत झाली आणि महेंद्रने सिकंदरला धोबीपछाड देत अंतिम फेरी गाठली होती. अखेरीस महेंद्र गायकवाडलाही निसटत्या पराभवाला सामोरं जावं लागलं. हर्षवर्धन सदगीरने याआधी २०२०चा महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला होता.



त्यावेळी त्याने वेताळ शेळकेचा पराभव करत पहिल्यांदाच महाराष्ट्र केसरीचा किताब पटकावला होता. त्यानंतर हर्षवर्धनने आता सहा वर्षांनी अंतिम फेरीत धडक मारत मानाच्या गादीवर नाव कोरलं.

यंदाच्या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच ५ माजी महाराष्ट्र केसरी सहभागी झाले होते. मात्र, शिवराज राक्षे, पृथ्वीराज पाटील आणि गतविजेता पृथ्वीराज मोहोळ यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. त्यानंतर सिकंदर शेख अंतिम फेरी गाठू शकला नाही. त्यानंतर हर्षवर्धन सदगीरने विजेतेपद पटकावत डबल केसरी होण्याचा मान पटकावला.

# खरात प्रकरण अत्यंत गंभीर, आम्हीच त्याचा भांडाफोड केला

## देवेंद्र फडणवीस स्पष्टच बोलले, विरोधकांनाही थेटच सुनावले

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – खरात यांचं प्रकरण अत्यंत गंभीर आहे. इंटेलिजन्सच्या सहाय्याने आम्हीच त्याचा भांडाफोड केला आहे आणि आम्हाला याची कल्पना होती की, लाजेखातर किंवा सामाजिक दबावामुळे महिला एकदम पुढे येत नाहीत, म्हणून अशा प्रकारचे जे काही पीडित आहेत, त्यांना धीर देऊन, त्यांच्या घरच्यांना धीर देऊन, त्यांना समोर आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यामध्ये काही प्रमाणात महिला आता प्रतिसादही देत आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते पत्रकारांशी बोलत होते.

फडणवीस म्हणाले, ''या संपूर्ण प्रकरणाची अत्यंत वरिष्ठ स्तरावर मॉनिटरिंग होत आहे. यासंदर्भात मी डीजींना सांगितले आहे की, त्यांनी याचे मॉनिटरिंग करावे. याच्यामध्ये एसआयटी तयार करण्यात आली आहे. नाशिक सीपी आणि एसआयटी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. मला असे वाटते की या संदर्भात कुठल्याही परिस्थितीत कुणालाही सोडले जाणार नाही. आता याला रंग देण्याचा काही प्रयत्न चाललेला आहे. कुणाजवळ काही पुरावा असेल तर त्यांनी तो निश्चित आणून द्यावा. त्याच्यावरही कारवाई होईल. पण विनाकारण प्रत्येक गोष्टीला केवळ राजकीय रंग... आता अनेक लोकं जायचे. विरोधी पक्षाचे कोण कोण गेलेत त्यांचे मी पुरावे देऊ शकतो? सर्वांत जास्त तर माझ्याकडे पुरावे आहेत याचे, पण ते पोलिसांकडे आहेत. ते पोलिसांचे काम आहे, ते माझे काम नाही.''

फडणवीस पुढे म्हणाले, ''खरातांना भेटणाऱ्यांपैकी कोणाचेही सहभाग आढळला तर, कारवाई होईल. मात्र, कोणी भेटलं, यावरून आपण कारवाई करायला लागलो, तर मग तुम्हालाही माहितच आहे की, कोण-कोण, काय-काय, कसं-कसं करायचं. त्यांना अऊट ऑफ टर्न जाऊन पाणी कुणी दिलं? कसं दिलं? चाळीस किलोमिटर पाण्याची लाइन कशी दिली? हे सगळं तुम्ही काल दाखवलं. यामुळे मला असं वाटतं की यामध्ये राजकारण करू नये. हा महिलांच्या सन्मानाचा प्रश्न आहे, अशा प्रकारे आपल्या तथाकथित शक्तींचा उपयोग करून महिलांना भरीस पाडणं यापेक्षा वाईट गुन्हा असू शकत नाही. काही झालं तरी त्यांना त्याची शिक्षा ही भोगावीच लागेल. सरकार आणि पोलीस याकरता जे करावं लागेल ते करायला तयार आहे.''

''कोणाचाही कुणासोबतही फटो असू शकतो. पण ज्यांनी मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलवून चाळीस किलोमिटर दुरून त्यांना पाणी दिलं, त्यांना काय शिक्षा द्यायची? आणि मंत्र्यांबद्दल बोलणारे त्यांच्याबद्दल का चूक आहे? तेथे तोंडाला कुलूप का लागतंय? सिलेक्टिव्ह का बोलत आहेत? काहींना केवळ राजकारण करायचे आहे. आम्हाला राजकारणात रुची नाही. आम्हाला महिलांचा सन्मान महत्वाचा वाटतो. ज्या महिलांच्या सोबत त्यांनी दुर्व्यवहार केलाय त्या प्रत्येक महिलेला न्याय दिल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. तसेच जेथे आर्थिक व्यवहार दिसून येतील, त्यासंदर्भातही चौकशी केली जाईल,'' असेही फडणवीस यावेळी म्हणाले.''

# ...तर होर्मुझची सामुद्रधुनी आम्ही पूर्णपणे बंद करणार, इराणचा अमेरिकेला मोठा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**तेहरान–** गेल्या काही दिवसांपासून अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध पेटलं आहे. अमेरिका-इस्रायल हे संयुक्तपणे इराणवर हल्ले करत असल्यामुळे इराण हादरलं आहे. या युद्धात आतापर्यंत इराणच्या शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला आहे. एवढंच नाही तर इराणच्या अनेक नेत्यांचा आणि लष्करी अधिकाऱ्यांचाही मृत्यू झाला आहे. पण तरी हे युद्ध अद्यापही थांबलेलं नाही.

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये तणाव निर्माण झालेला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या व्यापारात अडथळे निर्माण होत असून याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. मात्र, अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे रोज इराणला धमकी देणारे वक्तव्य करत आहेत. त्यामुळे हे युद्ध आणखी भडकण्याची चिन्ह दिसून येतात.

दरम्यान, होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याच्या अनुषंगाने डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला मोठा इशारा देत ४८ तासांत सामुद्रधुनी खुली करण्याची धमकी दिली होती. पण या धमकीमुळे इराणने संताप व्यक्त केला आणि त्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी अमेरिका आणि इस्रायल वगळता बाकी सर्वांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय घेतल्यानंतर काही तासांतच आता पुन्हा एकदा याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

'अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला करण्याच्या धमक्यांची अंमलबजावणी केली तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल', असा मोठा इशारा इराणने रविवारी दिला आहे. इराणच्या खतम अल-अंबिया या लष्करी कमांड युनिटने हा इशारा दिला आहे.

''जर इराणचे वीज प्रकल्प उद्धवस्त करण्याच्या अमेरिकेने दिलेल्या धमक्यांची अंमलबजावणी झाली तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल आणि जोपर्यंत आमचे नष्ट झालेले वीज प्रकल्प पुन्हा बांधले जात नाहीत तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी सुरू केली जाणार नाही'', असं इराणच्या लष्करी कमांड युनिटने सरकारी टिव्हीवर प्रसारित केलेल्या एका निवेदनात म्हटल्याचं न्यूज १८ ने एका वृत्तात म्हटलं आहे. अमेरिका आणि इस्रायल युद्धामुळे जगभरात ऊर्जा पुरवणाऱ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या जलमार्ग म्हणजेच होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्येही मोठा तणाव आहे. त्यामुळे जागतिक व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. मात्र, ही होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला मोठा इशारा दिला होता. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटलं की, ''जर हा जलमार्ग पुढच्या ४८ तासांत कोणत्याही धोक्याशिवाय पूर्णपणे खुला झाला नाही, तर अमेरिका इराणच्या सर्वात मोठ्या वीज प्रकल्पापासून सुरुवात करून विविध ऊर्जा प्रकल्पांना उद्ध्वस्त करेल.''

# अशोक खरात प्रकरणात १०० नाही तर २०० व्हिडीओ, विजय वडेट्टीवार यांचा दावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – नाशिकमधील अशोक खरात प्रकरणाची सध्या मोठी चर्चा सुरू आहे. भोंदूबाबा अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाली असून एसआयटीची चौकशी सुरू आहे. अशोक खरात प्रकरणावर आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत सविस्तर भाष्यही केलं. त्यानंतर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या अशोक खरात प्रकरणावर बोलताना मोठं भाष्य केलं आहे. अशोक खरात प्रकरणात १०० नाही तर २०० व्हिडीओ असल्याचा दावा विजय वडेट्टीवार माध्यमांशी बोलताना केला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

''अशोक खरातबरोबर आता अनेकांची वरात निघणार आहे. खूप लोक त्यामध्ये आहेत. मी तर म्हणेन की कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा. सरकारचे एवढे मंत्री त्यामध्ये अडकले असताना सरकारकडून कोणतीही दखल घेतली जात नाही. महिला आयोगाच्या पदावर असलेल्या एका महिला नेत्याचे फोटोही आपण त्या अशोक खरात बरोबर पाहतो. हे फारच विदारक आहे. या भोंदूगिरीला खत पाणी घालण्यासाठी जबाबदार फक्त सरकार आहे'', अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

''अशोक खरातच्या प्रकरणावर उद्या आम्ही सभागृहात बोलणार आहोत. कोण-कोण मोहरे यामध्ये अडकले आहेत? यांच्या हातात विकासाची दोरी दिली. पण हे मात्र अशा प्रकारे भोंदूबाबाबरोबर ज्योतिषाची दोरी ओढत आहेत. अशा प्रकारची भोंदूगिरी पोसण्यासाठी फक्त भारतीय जनता पक्ष जबाबदार आहे'', अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. ''अशोक खरात प्रकरणात जवळपास २०० व्हिडीओ आहेत. त्यातील ९० व्हिडीओ हे आक्षेपार्ह आहेत अशी माहिती समजती आहे. यामध्ये अनेक मंत्री आहेत, अनेक आयएएस अधिकारी आहेत. या सगळ्यांची गच्छंती झाली पाहिजे, कारवाई झाली पाहिजे'', अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली.

# अशोक खरातला झटका, आणखी तीन पीडित महिलांनी भोंदूबाबाच्या कुकर्मचा पाढा वाचला, एसआयटीकडून गोपनीय चौकशी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक** – नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात प्रकरणात दररोज नवे धक्कादायक खुलासे समोर येत असताना आता तपासाला आणखी वेग आला आहे. आधीच गंभीर आरोपांना सामोरे जात असलेल्या खरातविरोधात आणखी तीन पीडित महिलांनी पुढे येत तक्रार नोंदवण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढली असून, तपास यंत्रणांना महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या तिन्ही महिलांना विश्वासात घेऊन त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी गोपनीय पद्धतीने चौकशी करण्यात येत आहे. विशेष तपास पथक या महिलांचे जबाब अत्यंत संवेदनशीलतेने नोंदवत असून, या नव्या साक्षींमुळे खरातविरोधातील पुरावे अधिक मजबूत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशोक खरातने महिलांचे शोषण केल्याचे १०० हून अधिक व्हिडिओ असल्याची माहिती देखील समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणात आता आर्थिक गैरव्यवहारांचाही तपास सुरू झाला आहे. आयकर विभागानेही यात एन्ट्री घेतली असून, खरातच्या मालमत्ता, व्यवहार आणि उत्पन्नाच्या स्रोतांची सखोल चौकशी केली जाणार आहे. नाशिकसह विविध ठिकाणी असलेल्या मालमत्तांचा तपशील गोळा केला जात असून, कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांची छाननी केली जाणार आहे.

# भोंदूबाबा अशोक खरातचा आणखी एक कारनामा; गरोदर महिलेवरही अत्याचार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक** – महिलेवरील अत्याचार प्रकरणी पोलीस कोठडीत असणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरातची धक्कादायक प्रकरणे आता एकापाठोपाठ एक समोर येऊ लागली आहेत. गरोदरपणात करावयाच्या पूजाविधीचे कारण देत खरातने लैंगिक शोषण केल्याप्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. अडचणी घेऊन विश्वासाने येणाऱ्या महिलांशी भोंदूबाबा अघोरी कृत्य करीत असल्याचे पुढे आले आहे.

मंत्री आणि राजकीय नेत्यांचे भविष्य कथन, सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथे ईशानेश्वर मंदिराची स्थापना या माध्यमातून दबदबा निर्माण करणारा खरात हा भक्तांच्या अडचणींवर तोडगा अथवा फलप्राप्ती होण्यासाठी मंत्र-तंत्राच्या आधारे विविध उपाय सांगून महिलांचे लैंगिक शोषण करीत असल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भात एका पीडितेने हिंमत दाखवल्यानंतर दुसऱ्या प्रकरणात खरातकडे गरोदर पत्नीला घेऊन गेलेला पती तक्रार देण्यासाठी पुढे आला.

२१ नोव्हेंबर २०२३ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत शहरातील कॅनडा कॉर्नरवरील ओकस प्रॉपर्टीज या खरातच्या कार्यालयात शोषणाचा हा प्रकार घडला. गरोदरपणातील विधी करावयाचे सांगून खरातने अत्याचार केले. याबाबत कुठेही वाच्यता केल्यास पतीसह कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

कार्यालयात विश्वासाने येणाऱ्या महिलांशी खरातने अघोरी प्रकार केले. गुंगीकारक पदार्थ खाण्यास आणि द्रव्य पिण्यास देत असे. महिलांना मोहित करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करीत असे. अशाच दुसऱ्या प्रकरणात सरकारवाडा पोलीस ठाण्यात खरातविरुद्ध बलात्कार आणि जादू टोणा प्रतिबंधात्मक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज्यातील हॉटेल, उपहारगृहांसाठी आणखी २० टक्के गॅस पुरवठा होणार, एकूण पुरवठा ५० टक्क्यांपर्यंत; मंत्री छगन भुजबळांची माहिती

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** – इराण आणि इस्रायल यांच्यातलं युद्ध सुरु झाल्यानंतर देशभरात एलपीजीचा तुटवडा निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये पुणे, मुंबई या ठिकाणी एलपीजीचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवतो आहे आता केंद्र सरकारने राज्य सरकारांना पत्र लिहून गॅस पुरवठ्याबाबत माहिती दिली आहे. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी याबाबतची माहिती दिली आहे.

केंद्र शासनाकडून राज्य सरकारला पत्र प्राप्त झालं आहे. त्या पत्राद्वारे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने व्यापारी एलपीजीच्या म्हणजेच कमर्शियल एलपीजीच्या वाटपासंदर्भात सर्व राज्यं आणि केंद्रशासित राज्यांना सूचना दिल्या आहेत. १८ मार्चच्या केंद्राच्या पत्राप्रमाणे पीएनजी विस्तारासाठी व्यवसाय सुधारण्याच्या आधारे ३० टक्के वाटप मंजूर करण्यात आलं आहे. २३ मार्चपासून पुढील सूचना येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे ५० टक्के वाटप आता होईल. आधी जे मिळत होतं त्याच्या ५० टक्के हा कोटा आहे अशी माहिती छगन भुजबळ यांनी सांगितलं. मात्र हे वाटप करताना केंद्र सरकारच्या काही अटी शर्थी आहेत.

अतिरिक्त २० टक्के कोटा हा हॉटेल, ढाबे, उपहारगृहं, औद्योगिक क्षेत्रातील कँटीन, अन्न प्रक्रिया दुग्ध व्यवसाय, राज्य शासन किंवा महापालिकांद्वारे चालवण्यात येणारी कँटीन्स, सामुदायिक स्वयंपाक घरं, स्थलांतरित मजुरांसाठी पाच किलो एफटीएल असं वाटप होणार आहे. तसंच गैरवापर होणार नाही याची काळजी घ्या असंही केंद्राने म्हटलं आहे.

यापारी आणि औद्योगिक एलपीजी ग्राहक आहेत त्यांना ५० टक्क्यातून एलपीजी मिळण्यासाठी पात्र होण्यापूर्वी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करावी लागणार आहे.

ज्या व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रातील लोकांना एलपीजी हवा आहे त्यांनी त्यांच्या शहरातील गॅस वितरण केंद्रांमध्ये पीएनजी अर्थात पाईप नॅचरल गॅससाठी अर्ज करणं आणि पीएनजी प्राप्त करण्यासाठीच्या सज्जतेची स्थिती प्राप्त करणं बंधनकारक आहे.

हॉटेल, ढाबे, कँटीन यांना काही प्रमाणांत एलपीजी मिळणार आहे. तेल विपणन कंपन्या आणि गॅस कंपन्यांकडे अर्ज करायचा आहे. राज्यात केरोसीन वितरित करण्यासाठीही राज्याने विचार केला होता. त्यामुळे आम्ही सर्व जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी आणि अधिकाऱ्यांना सांगितलं आहे की कीरकोळ आणि घाऊक वितरक आहेत त्यांचे परवाने नुतनीनकरण झालं नसेल, कुणाला विलंब झाला असेल अशा सगळ्या गोष्टी झाल्या आहेत असं समजायचं आणि वितरण करु द्यायचं. जेणेकरुन काही प्रमाणात लोकांची सोय होईल. काही प्रमाणात एलपीजी आणि काही प्रमाणात केरोसीन याचा फायदा राज्यातील व्यावसायिकांना होईल, घरगुती लोकांनाही होऊ शकणार आहे अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली.

# कशासाठी मोर्चा काढतायत त्यांनाच माहिती नाही, देवेंद्र फडणवीसांचा काँग्रेसला टोला!

**आत्ताच एक्सप्रेस**

**नागपूर** – राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) ही भाजपची मातृसंघटना आहे. आरएसएसच्या निर्देशानुसारच भाजप कार्य करीत असल्याची टीका अनेकदा झाली आहे. यापूर्वी बामसेफ आणि भारत मुक्ती मोर्चाच्या वतीने आरएसएस मुख्यालयावर मोर्चा काढण्यात आला. बामसेफच्या कार्यक्रमास आरएसएसच्या इशाऱ्यावरून परवानगी नाकारण्यात आल्याचा आरोप करीत नागपुरात संघ मुख्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. आता काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीकडून आरएसएसच्या मुख्यमालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. एपस्टिन फाइलवरून ते मोर्चा काढणार आहे. एपस्टिन फाइलवर स्पष्टीकरण देत संबंधितांवर कारवाईचीही मागणी आहे. सोमवारला हा मोर्चा काढण्यात येणार आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहेत. तर या मोर्चावर सत्ताधाऱ्यांचेही लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले की, लोकशाहीत कुणालाही कुणाविरोधात मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. परंतु ते कशासाठी मोर्चा काढत आहे, हे त्यांनाच माहीत नसल्याची टीका फडणवीस यांनी केली.

# गंगा येऊ दे घरोघरी

स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी ग्रामीण भारतातील घरोघरी पोचवण्याचा उद्देश समोर ठेवून सुरू झालेल्या जल जीवन कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची नुकतीच घोषणा झाली. २२ मार्चच्या जागतिक जलदिनानिमित्ताने या कार्यक्रमाचा हा आढावा. 'पाणी हे जीवन आहे आणि स्वच्छ पाणी म्हणजे स्वास्थ्य.' ऑड्री हेपबर्न (प्रसिद्ध ब्रिटिश अभिनेत्री) पाण्याला 'जीवन' का म्हणतात, याचा अर्थ त्यांना विचारावा ज्यांना ते 'जीवन' घरच्या नळाची तोटी फिरवताच मुबलकतेने उपलब्ध होत नाही आणि पाणी हे जीवनमरणाचे हत्यार म्हणून कसे वापरले जाऊ शकते हे अमेरिका-इराण यांच्यातील ताज्या संघर्षातून जाणून घ्यावे, जिथे दोन्ही बाजूंनी परस्परांच्या पाणी प्रकल्पांवर हल्ले केले आहेत!

जगभरातील २.२ अब्जांहून अधिक, म्हणजे २६ टक्के लोकसंख्येला आजही स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी खात्रीशीररीत्या उपलब्ध होत नाही. यावर कहर म्हणजे जगाच्या निम्म्या लोकसंख्येला आजही वर्षातून किमान एक महिना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागते.

भारतासारख्या विकसनशील देशातील परिस्थिती यापेक्षा फार वेगळी असणे शक्य नव्हते. स्वातंत्र्य मिळाल्यापासूनच आपला देश एकीकडे नागरिकांच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची विवंचना दूर करण्यासाठीची पावले उचलत आहे आणि दुसरीकडे त्यांना रस्ते, वीज आणि पाणी या प्राथमिक सोयी देण्यासाठीही प्रयत्नशील आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वळणावर पोचेपर्यंत यातील पाण्याचा स्रोत गावपातळीपर्यंत उपलब्ध करून देण्यात आपण बऱ्यापैकी यशस्वीही झालो. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा त्याच हेतूने राबवण्यात आला. परंतु घरोघरी पाणी पोचवण्याचा विचार त्यामागे नव्हता. २०१९मध्ये 'जल जीवन कार्यक्रमा'ची घोषणा केंद्रातील सरकारने केली आणि आपल्या घरापर्यंत नळाद्वारे पाणी आलेले पाहण्याचे स्वप्न ग्रामीण भारतातील जनता पाहू लागली. पाच वर्षांचा टप्पा पूर्ण करून आता हा कार्यक्रम दुसऱ्या टप्प्यात राबवण्याची सुरुवात झाली आहे.

दर वर्षी २२ मार्चला संयुक्त राष्ट्रांतर्फे जागतिक जलदिन साजरा केला जातो. पाणी आणि लैंगिक समानता ही यंदाच्या या दिनाची संकल्पना आहे. 'जिथे पाणी पोचते तिथे समानताही प्रवाहित होते,' हे घोषवाक्य याच्या प्रचारमोहिमेसाठी निवडण्यात आले आहे. जल जीवन कार्यक्रम हा या संकल्पनेनुसार पाण्यासाठीची महिला वर्गाची वणवण थांबवण्यास हातभार लावणारा ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर २०१९च्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जल जीवन कार्यक्रमाची घोषणा केली. ही घोषणा झाली, तेव्हा देशातील ३.२ कोटी, म्हणजे १७ टक्के ग्रामीण घरांपर्यंत थेट नळाद्वारे पाणी पोचले होते. 'हर घर जल' म्हणजे ग्रामीण भारतातील प्रत्येक घरामध्ये पिण्याचे पाणी पोचवणे हा त्याचा स्पष्ट उद्देश ठेवला. राष्ट्रीय स्तरावर निश्चित केलेल्या निकषांनुसार दरडोई किमान ५५ लिटर एवढे स्वच्छ, खात्रीशीर आणि नियमित पाणी पुरवण्याच्या योजना आखण्यास सुरुवात झाली. देशाच्या ग्रामीण भागात सहा लाखांहून अधिक गावांमध्ये सुमारे १९ कोटी घरे आहेत. प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोचवण्यासाठी जलस्रोतांपासून पाणी उचलणे, पाइपलाइनद्वारे ते दूर अंतरावर नेणे, पम्पिंग स्टेशन उभारणे, साठवण टाक्या उभारून ते वितरित करणे यांचे अजस्र जाळे उभारावे लागणार होते. परंतु केवळ पायाभूत सोयी उभारल्याने हे काम प्रत्यक्षात उतरणार नव्हते. त्यासाठी समाजाचा सहभाग महत्त्वाचा होता. हे लक्षात घेऊन सरकारने यासाठी गावपातळीवर पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या समित्या स्थापन केल्या.

शाश्वत पाणीपुरवठा स्रोत निवडणे, ते पाणी उचलून पुरवठा करण्यापूर्वी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, गावोगावी ते पाणी पोचवण्यासाठी पाइपलाइन टाकणे, त्यांतून ते साठवण टाक्यांपर्यंत पोचवणे आणि प्रत्येक गावातील अशा टाक्यांपासून घराघरापर्यंत नळाद्वारे नेणे यासाठी पाच वर्षांचा कालावधी ठरवण्यात आला. प्रकल्प उभारणीची जबाबदारी राज्य सरकारांवर सोपवली गेली. केंद्र सरकारने अर्थसाह्य आणि धोरणात्मक दिशादर्शनाची जबाबदारी उचलली. हिमालयाच्या कुशीतील आणि ईशान्य भारतातील राज्यांमधील भूभागाची आव्हाने लक्षात घेता त्यांना अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात आला.

अनेक राज्यांनी या योजना राबवताना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेतला. त्यातून प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची तत्क्षणीची स्थिती समजणारे डिजिटल डॅशबोर्ड, पायाभूत सोयींची सद्यस्थिती समजण्यासाठी जिओटॅगिंग, देखरेखीसाठी सेन्सरवर आधारित यंत्रणा यांमुळे ही योजना केवळ कागदावर न राहता प्रत्येक घरापर्यंत खरोखरी पाणी पोचवणारी ठरेल, या दृष्टीने प्रयत्न झाले.

राज्य सरकारांचा पुढाकार

हा कार्यक्रम २०१९मध्ये हाती घेतला, तेव्हा देशाच्या ग्रामीण भागांतील दर पाचापैकी एका घरातही नळाद्वारे पाणी पोचलेले नव्हते. परंतु पाच वर्षांत हे चित्र आमूलाग्र बदलले. दर पाचापैकी चार, म्हणजे ८० टक्के ग्रामीण घरांमध्ये पिण्याचे पाणी पोचले. गोव्याने यामध्ये आघाडी घेत प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी पोचवणारे पहिले राज्य होण्याचा मान मिळवला. गुजरात, हरियाणा, पंजाब, तेलंगण आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनाही प्रत्येक ग्रामीण घरापर्यंत पिण्याचे पाणी पोचवले आहे. महाराष्ट्रात २०१९मध्ये ४९ टक्के ग्रामीण घरांमध्ये पिण्याचे पाणी पोचले होते. हे प्रमाण आता ८९ टक्के झाले आहे.

काही राज्यांनी पिण्याचे पाणी पुरवण्याच्या प्राथमिक उद्दिष्टापलीकडे नेणारी पावले टाकली. नागालँडच्या वोखा जिल्ह्यामध्ये डोंगरउतारावरील वस्त्यांपर्यंत पाणी पोचवण्यासाठी अशा भूभागांमध्ये जलपुनर्भरणाच्या योजना हाती घेण्यात आल्या. त्यामुळे उन्हाळ्यांमध्येही त्या भागांतील या योजनांचे नळ वाहते राहिले. आसाममधील बोर्बोरी या गावाने या योजनेकडे अतिसार आणि त्वचाविकार दूर करण्याची संधी म्हणून पाहण्याचा निर्धार केला. त्यामुळे योजना कार्यान्वित झाल्यापासून दोनच वर्षांत गावातील जलजन्य आजार शून्यावर आले. जल जीवन कार्यक्रमाचा तोंडवळा पिण्याचे पाणी पुरवणाऱ्या योजनांचा असला, तरी प्रत्यक्षात हा कार्यक्रम ग्रामीण भागांतील आरोग्यरक्षण, महिला सक्षमीकरण, शिक्षणप्रसार आणि एकूणच ग्रामीण विकासाला चालना देणारा ठरत आहे. भारतात आजही ७० टक्के आजार साथी या जलजन्य आजारांतून उद्भवतात. त्यात गेल्या पाच वर्षांत दहा हजारांवर नागरिकांचे बळी गेले आहेत. घरोघरी नळाद्वारे येणाऱ्या पाण्यामुळे पिण्याचे पाणी साठवण्यासाठीचे घरातील महिलांवरचे जबाबदारीचे ओझे दूर झाले आहे. त्यांचा हा वेळ अन्य कौटुंबिक कारणांबरोबरच स्वतःच्या शिक्षण व प्रगतीसाठीही त्यांना वापरता येत आहे. शिकण्याच्या वयातील मुलींना याचा मोठा फायदा होत असून त्यांची शाळांतील उपस्थिती अधिक नियमित होत आहे. या अप्रत्यक्ष फायद्यांबरोबरच या योजना उभारणे व कार्यान्वित ठेवणे यांसाठी ग्रामीण भागांत रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे.

# शहीद दिन : अमर बलिदानाची प्रेरणादायी गाथा



२३ मार्च हा दिवस भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण, हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी असा दिवस म्हणून नोंदवला गेला आहे. या दिवशी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या तीन तरुण क्रांतिवीरांनी आपल्या आयुष्याचा सर्वात मौल्यवान ठेवा आपले प्राण भारताच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केले. त्यांच्या या बलिदानाने संपूर्ण देशाला एक नवी दिशा दिली आणि स्वातंत्र्यलढ्याला अधिक तीव्र गती प्राप्त करून दिली. म्हणूनच हा दिवस केवळ शोक व्यक्त करण्याचा नाही, तर देशभक्ती, त्याग आणि स्वाभिमान यांचा जागर करणारा दिवस आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा अनेक शतकांच्या संघर्षाचा परिपाक होता. परकीय सत्तेच्या जोखडाखाली दबलेल्या भारतभूमीला स्वातंत्र्याची आस लागली होती. अनेकांनी विविध मार्गांनी या लढ्यात सहभाग घेतला. काहींनी अहिंसेचा मार्ग स्वीकारला, तर काहींनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग निवडला. या सर्व प्रयत्नांचा उद्देश एकच होता तो म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे. या पार्श्वभूमीवर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते.

भगतसिंग यांचे बालपण देशभक्तीच्या वातावरणात गेले. त्यांच्या कुटुंबात स्वातंत्र्यलढ्याची परंपरा होती. लहानपणापासूनच त्यांनी देशासाठी काहीतरी मोठे करण्याचा निर्धार केला होता. जालियनवाला बाग हत्याकांडाने त्यांच्या मनावर खोल परिणाम केला. त्या अमानुष घटनेने त्यांच्या अंतःकरणात ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र संताप निर्माण केला. त्यांनी शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक संघटनांमध्ये प्रवेश केला आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन अर्पण करण्याचा संकल्प केला.

राजगुरू हे अत्यंत धाडसी आणि साहसी होते. त्यांच्या नेमबाजीचे कौशल्य अतुलनीय होते. त्यांनी आपल्या कौशल्याचा उपयोग देशाच्या स्वातंत्र्यासाठी केला. त्यांची निष्ठा आणि धैर्य पाहून सहकारी क्रांतिकारक त्यांच्यावर विश्वास ठेवत. सुखदेव हे बुद्धिमान आणि संघटन कौशल्य असलेले होते. त्यांनी युवकांना एकत्र आणून क्रांतीचा पाया मजबूत केला. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे स्वातंत्र्यलढ्याला एक नवी दिशा मिळाली.

लाला लाजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी त्यांनी सॉंडर्सचा वध केला. हा केवळ बदला नव्हता, तर तो अन्यायाविरुद्धचा एक ठाम प्रतिकार होता. या कृतीने ब्रिटिश सत्तेला स्पष्ट संदेश दिला की भारतीय तरुण अन्याय सहन करणार नाहीत. या घटनेने संपूर्ण देशात एक नवा उत्साह निर्माण झाला.

यानंतर त्यांनी केंद्रीय विधानसभेत बॉम्ब टाकण्याची योजना आखली. या कृतीमागील उद्देश हिंसाचार नव्हता, तर ब्रिटिश सत्तेला जागृत करणे हा होता. त्यांनी बॉम्ब टाकल्यानंतर पळून जाण्याऐवजी स्वतःहून अटक दिली. या कृतीने त्यांच्या धैर्याचे आणि प्रामाणिकतेचे दर्शन घडले. त्यांनी न्यायालयात आपल्या विचारांची प्रभावी मांडणी केली.

कारागृहात असताना त्यांनी कैद्यांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. त्यांनी उपोषण करून अन्यायकारक वागणुकीचा निषेध केला. त्यांच्या या संघर्षामुळे संपूर्ण देशाचे लक्ष या समस्येकडे वेधले गेले. त्यांनी आपल्या शरीराला त्रास सहन करूनही आपले तत्त्व सोडले नाही.

भगतसिंग हे केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते एक विचारवंतही होते. त्यांनी समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्याय यांविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या लेखनातून त्यांच्या विचारांची प्रगल्भता दिसून येते. त्यांनी युवकांना जागृत करण्याचे कार्य केले.

२३ मार्च १९३१ रोजी या तिघांना फाशीची शिक्षा देण्यात आली. ही शिक्षा नियोजित वेळेपेक्षा आधी देण्यात आली, जेणेकरून जनतेचा उद्रेक टाळता येईल. पण त्यांच्या मृत्यूने उलट जनतेचा संताप अधिक वाढवला. त्यांच्या बलिदानाने स्वातंत्र्यलढ्याला नवी ऊर्जा मिळाली.

या तिघांच्या बलिदानामुळे भारतीय समाजात एक नवीन चेतना निर्माण झाली. त्यांनी दाखवून दिले की स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्याग आणि संघर्ष आवश्यक आहे. त्यांच्या जीवनातून आपल्याला देशप्रेम, धैर्य आणि निष्ठा यांचे महत्त्व समजते.

आजच्या काळात त्यांच्या विचारांची अधिक गरज आहे. समाजात वाढत चाललेली असमानता, अन्याय आणि भ्रष्टाचार यांविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या विचारांची प्रेरणा आवश्यक आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आपले जीवन अर्पण केले, ती मूल्ये जपणे ही आपली जबाबदारी आहे.

शहीद दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण त्यांच्या बलिदानाचा सन्मान कसा करतो, हे महत्त्वाचे आहे. त्यांच्या विचारांचे आचरण करणे, समाजासाठी कार्य करणे आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे बलिदान हे भारतीय इतिहासातील अमर अध्याय आहे. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा आनंद घेत आहोत. त्यांच्या स्मृती सदैव आपल्या हृदयात जिवंत राहतील.

आजच्या तरुण पिढीने त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अत्यंत तरुण वयात जे कार्य केले, ते अभूतपूर्व आहे. त्यांनी व्यक्तिगत सुखाचा त्याग करून राष्ट्रहिताला प्राधान्य दिले. त्यांच्या या त्यागातून आपल्याला प्रेरणा मिळते.

स्वातंत्र्य टिकवण्यासाठी सतत जागरूक राहणे आवश्यक आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि असमानता यांविरुद्ध लढणे हीच खरी देशभक्ती आहे. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या आदर्शांचे पालन करून आपण समाज आणि देशाच्या प्रगतीसाठी योगदान देऊ शकतो.

शेवटी, या महान क्रांतिकारकांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचे पालन करण्याचा संकल्प केला पाहिजे. त्यांच्या बलिदानाची ज्योत आपल्या हृदयात सदैव प्रज्वलित ठेवली पाहिजे. हाच त्यांच्या प्रति खरा आदर आणि कृतज्ञतेचा भाव ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक

***

# वाचन संस्कृतीला बळ देण्यासाठी पुस्तकांचे दर परवडणारे हवेत



अलीकडे ठाणे येथील पुस्तक प्रदर्शनाला भेट देण्याचा योग आला आणि तेथे एक आनंददायी व आश्वासक चित्र पाहायला मिळाले. ज्येष्ठ नागरिकांसह युवा पिढीची लक्षवेधी उपस्थिती विशेष समाधान देणारी होती. आजकाल वाचनाची सवय कमी झाली आहे किंवा लोकांनी पुस्तकांकडे पाठ फिरवली आहे, असा जो सर्वसाधारण समज आहे, तो काही अंशी चुकीचा असल्याचे प्रकर्षाने जाणवले.

प्रदर्शनामध्ये तरुण वाचक गटागटाने पुस्तकांवर चर्चा करताना, आपापले विचार मांडताना दिसत होते. अनेक जण पुस्तक चाळत असताना त्यातील आशयावर मनोगत व्यक्त करत होते. काहीजण लेखक, विषय आणि साहित्यप्रकार यांची तुलना करताना दिसले, तर काही जण नव्या पुस्तकांची यादी तयार करत होते. हे दृश्य खरोखरच प्रेरणादायी होते. यावरून स्पष्ट होते की, वाचक आजही आहेत आणि त्यांच्यात वाचनाची आवडही तितकीच जिवंत आहे.

युवा पिढीमध्ये ज्ञानाची ओढ आणि नवीन विषय समजून घेण्याची उत्सुकता आहे, हे या प्रदर्शनातून स्पष्टपणे दिसून आले. स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, विज्ञान, इतिहास अशा विविध विषयांवरील पुस्तकांकडे त्यांचा ओढा दिसून आला. त्यामुळे वाचन संस्कृती संपत चालली आहे, हा समज पूर्णपणे चुकीचा ठरतो.

मात्र, या सकारात्मक चित्रासोबत एक वास्तवही नाकारता येत नाही. सर्वसामान्य वाचकांची आर्थिक क्षमता आणि पुस्तकांच्या वाढत्या किमती यामध्ये ताळमेळ बसत नाही. आज अनेक दर्जेदार पुस्तके शेकडो रुपयांच्या घरात उपलब्ध आहेत. मध्यमवर्गीय आणि विद्यार्थ्यांसाठी ही किंमत परवडणारी नसते. अनेकांना स्वतःचा पुस्तकसंग्रह असावा, घरात छोटेखानी वाचनालय असावे, असे वाटते; परंतु पुस्तकांच्या वाढत्या किंमतीमुळे ही इच्छा अपुरीच राहते.

विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा अधिक फटका बसतो. त्यांना वाचनाची आवड असूनही आवश्यक पुस्तके विकत घेणे कठीण जाते. परिणामी, त्यांची ज्ञानप्राप्ती मर्यादित राहण्याची शक्यता निर्माण होते.

यावर उपाय म्हणून पुस्तक प्रकाशक, विक्रेते आणि शासन यांनी एकत्रितपणे पुढाकार घेणे आवश्यक आहे. पुस्तकांवर सवलती देणे, मोठ्या प्रमाणावर विक्री करून दर कमी ठेवणे, अनुदानित पुस्तक योजना राबविणे, तसेच जिल्हा आणि तालुका स्तरावर सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या व गुणवत्ता वाढविणे यांसारखे उपाय प्रभावी ठरू शकतात. याशिवाय 'बुक बँक' संकल्पना अधिक बळकट करणे, शाळा व महाविद्यालयांमध्ये पुस्तक शेअरिंग उपक्रम राबविणे इत्यादी.

वाचन ही केवळ छंदाची गोष्ट नसून ती व्यक्तिमत्त्व विकासाची, विचारशक्ती वाढविण्याची आणि समाज प्रबोधनाची महत्त्वाची कडी आहे. वाचनामुळे व्यक्ती अधिक संवेदनशील, विचारशील आणि जागरूक बनते. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी वाचन संस्कृती बळकट करणे अत्यावश्यक आहे.

त्यासाठी पुस्तकांचे दर सर्वसामान्यांना परवडणारे असणे ही काळाची गरज आहे. शासन, प्रकाशक आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास वाचन संस्कृतीला नवसंजीवनी मिळेल. अशा उपक्रमांमुळे ''वाचेल तो वाचेल'' हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्षात उतरलेला दिसेल.

**– विश्वनाथ पंडित,**
**ठाणे**

**

# एक फ्लॅट, दोन कुटुंब आणि तुफान राडा!, 'सुपर डुपर'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये सहकुटुंब सहपरिवार बघता यावा अशा धमाल मनोरंजनाची मेजवानी असणाऱ्या सुपर डूपर या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. नावाप्रमाणेच हा ट्रेलरही सुपर डुपरझाला असून यात एकमेकांवर कुरघोडी करणारे एकाहून एक मातब्बर कलाकार बघून हा चित्रपट पैसा वसूल करणारा ठरेल अशी प्रतिक्रिया प्रेक्षक देत आहेत. झी स्टुडिओज प्रस्तुत, नाईंटी नाइन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित तथा समीर आशा पाटील दिग्दर्शित सुपर डुपर हा चित्रपट येत्या ३ एप्रिलला प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे.



नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर एका दिमाखदार सोहळ्यात प्रदर्शित करण्यात आला. ट्रेलरमध्ये एका घराभोवती फिरणारा गंमतीदार गोंधळ दिसत आहे. एका बाजूला परंपरा जपणारे गावाकडचे कुटुंब, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक विचारांची कास धरणारी शहरातलं तरुण जोडपं. या दोन्ही कुटुंबांना एकाच फ्लॅटची विक्री होते आणि या घराच्या ताब्यावरून वादाची ठिणगी पडते. आता एकच घर आणि राहणारे दोन टोकाचे गट दोघांची जीवनशैली, सवयी आणि विचार अगदी वेगळे असल्यामुळे एकत्र राहतानाची त्यांची मजेशीर जुगलबंदी ट्रेलरमध्ये दिसत आहे. दरम्यान, या सगळ्या गोंधळात 'झाड उगायला माती आणि माणूस जगायला नाती लागतातच' हा निर्मिती सावंत यांच्या तोंडी असलेला भावस्पर्शी संवादही ट्रेलरमध्ये लक्ष वेधून घेतो. विनोद, नात्यांमधली ऊब आणि भावनिक क्षण यांचा सुंदर मेळ यात दिसून येतो. नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन समीर आशा पाटील यांनी केले आहे. विजय शिंदे आणि नरेश बोर्डे हे या चित्रपटाचे निर्माते असून उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ते आहेत. तर छायांकन संजय जाधव यांनी केले आहे. निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते यांच्यासह ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले हे कलाकार या चित्रपटात प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत.

या ट्रेलर लाँच प्रसंगी दिग्दर्शक समीर आशा पाटील म्हणाले, '' 'सुपर डुपर' हा केवळ विनोदी चित्रपट नाही, तर नात्यांमधल्या गंमतीजमती आणि त्यामागची भावनिक बाजू दाखवणारा प्रवास आहे. दोन पूर्णपणे वेगळ्या स्वभावाची कुटुंबं एकाच घरात राहायला लागली की, किती गंमतीशीर प्रसंग घडू शकतात, हे आम्ही हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडलं आहे. ट्रेलरमधून त्याची फक्त झलक पाहायला मिळते. परंतु चित्रपटात प्रेक्षकांना हास्य, गोंधळ आणि नात्यांची ऊब असा सगळाच अनुभव मिळेल, असा आमचा विश्वास आहे.''

झी स्टुडिओज् मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणाले की, '' प्रेक्षकांची मनोरंजनाची भूक लक्षात घेऊन त्यांना आवडेल अशीच मेजवानी देणारा हा चित्रपट आहे. एकाहून एक मातब्बर कलाकार यात बघायला मिळणार असून प्रेक्षकांना हसवण्याबरोबरच , त्यांना भावनिक करणारा आणि प्रसंगी अंतर्मुखही करणारा हा चित्रपट आहे. संपूर्ण कुटुंबाने चित्रपटगृहात एकत्र येऊनच अनुभवावा असा हा चित्रपट झाला आहे. यामुळेच, यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत सर्वांना एक खास कौटुंबिक महासोहळा अनुभवायला मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे.''

# गश्मीर महाजनीचा दमदार 'गोंधळ' !

गावोगावी फिरून आई जगदंबेचा जागर करणारे गोंधळी म्हणजे आपल्या लोकसंस्कृतीचा महत्त्वाचा घटक. त्यांची भक्ती, त्याची ऊर्जा आपल्यातही चैतन्य निर्माण करते. येत्या १७ एप्रिलला प्रदर्शित होणाऱ्या आगामी 'सालबर्डी' या मराठी चित्रपटात अभिनेता गश्मीर महाजनी दमदार गोंधळी साकारताना दिसणार आहे.

'काळरातीचा जोर वाढला घोर, होई शिरजोर गं जगदंबे' ।
अंधार मातला थोर, असा घनघोर, लागला घोर गं जगदंबे ।

या गोंधळ नृत्यात गश्मीरने पारंपरिक वेशभूषा, प्रभावी देहबोलीसह कमालीचा नृत्याविष्कार सादर केला आहे. नुकतेच हे गीत प्रकाशित झाले असून त्याला जोरदार प्रतिसाद मिळतोय. जगदंबेचा हा गोंधळ कथानकात थरार आणि उत्सुकता वाढवणारा ठरणार आहे. संबळाच्या ठेक्यावर रहस्यमय वातावरणात गश्मीरची एन्ट्री वेगळीच रंगत वाढविणारी आहे. गीतकार मुकुंद भालेराव यांच्या लेखणीतून सजलेल्या या गोंधळाला संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांचा संगीतसाज आहे. अजय गोगावले यांचा दमदार स्वर गाण्याला लाभला आहे. हा गोंधळ आशिष पाटील यांनी आपल्या सदाबहार अदाकारीने नृत्यदिग्दर्शित केला आहे. गावातील गूढ शांततेच्या आड दडलेलं जीवघेणं रहस्य उलगडण्यासाठी हा गोंधळी येतोय का? अशा प्रश्नांची उत्सुकता यामुळे निर्माण झाली आहे. याबद्दल बोलताना गश्मीर महाजनी म्हणतो, 'गोंधळ ही केवळ परंपरा नाही, तर देवीभक्तीची एक ऊर्जादायी अभिव्यक्ती आहे'. 'सालबर्डी'मधील माझा गोंधळी हा कथानकाला वेगळी दिशा देणारा महत्त्वाचा दुवा आहे. गोंधळ गीतामध्ये असलेली ऊर्जा, नाद आणि पारंपरिक वातावरण यामुळे शूटिंग करतानाच अंगावर रोमांच उभे राहत होते. प्रेक्षकांनाही हा अनुभव नक्कीच जाणवेल.'' महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या 'सालबर्डी' गावात घडणाऱ्या रहस्यमय घटनांचा थरारक शोध घेणारा 'सालबर्डी' हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे. 'सालबर्डी' चित्रपटात पूजा सावंत, शशांक शेंडे, ओंकार भोजने, भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर, प्रवीण डाळिंबकर, अभय गिते, राजेंद्र सातार्डेकर, कोमल चौधरी आदि कलाकारांच्या भूमिका आहेत

# जय जवान जय किसान,कयाधू नदी वाचवा, जन संघर्ष आंदोलन; २४ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्याची जलवाहणी समजल्या जाणाऱ्या कयाधू नदीची पाणी हे नांदेड जिल्ह्याला जाणार असून सदरील काम तात्काळ रद्द करण्यासाठी काही कयाधू नदी वाचवा जनसंघर्ष मागणी करिता दि २४ मार्च २६. रोज मंगळावरला वेळ १२ वाजता हिंगोली चे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे यावेळी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जन संघर्ष समितीचे डॉक्टर रमेश शिंदे यांनी केले आहे.

दि.७ एप्रिल २०२६ रोज मंगळवार,१५ शेतकरी उपोषणाला बसनार असून हिंगोली व सेनगाव तालुक्यातील रोज ६ गावे सोबत ठिय्या आंदोलनाला सोबत बसणे, सदरील आंदोलन स्थळ चालू असलेला भूमीगत बोगदा, रेल्वे पटरीच्या बाजूला खांबाळा ता. जी.हिंगोली या ठिकाणी आहे.

यामध्ये प्रमुख खालील मागणे आहेत.

१.भूमिगत बोगदा २० किमी लांबी असून खोली १०० ते १५०, तसेच माळरानावर २०० फूट खोली असल्या कारणांने हिंगोली शहर, तसेच तालुक्यांतील २५ गावाची पाणी पातळी १०० ते २०० फुटा पर्यंत पाणी पातळी खाली खोल गेल्याने जाऊन विहीर,बोअरवेल पूर्ण अटणार आहेत, पाणी पिण्याचा २५ ग्रामपंचायती व हिंगोली शहर तसेच वरील परिसरातील शेतीसाठी पाणी प्रश्न भयानक निर्माण होणार जनता पाण्या साठी त्रस्त होणार असल्या कारणाने तात्काळ चालू असलेला कयाधू नदी वळून जाणारा बोगदा रद्द करा.२.कयाधू नदी उगमस्थान ते भूमिगत बोगदा वळवण्याच्या स्थानापर्यंत एकूण पाणी उपलब्धता १२७ दलघमी असून, नदी वळवून भूमिगत जाणारे पाणी १००.,तसेच २.००दलाघमी खरबी या होणारा बरेजेश, २५ दलघमी इडोळी,घोटा, नरसी,गिलोरी,ब्रम्हपुरी हे कयाधू नदी वरील बंधारे, व हळदवाडी,बाभूळगाव,थोरजवळा, बोराळा, बोराळवाडी, नवीन होणार



सुकळी असे मिळून २५ दलघमी या नंतर हिंगोली व सेनगाव तालुक्या तसेच कयाधू नदीत आता शिल्लक पाणी राहिलेले नसून या नंतर कयाधू नदी वर किंवा हिंगोली व सेनगाव तालुक्यात बॅरेजेस, बंधारा, तलाव,होणार नाही. शिल्लक पाणीच नसल्या कारणानं, हिंगोली व सेनगाव तालुक्यातीन शेतीला भविष्यात पाणी मिळणार नाही,या तालुक्यातील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्या कारणाने बोगदा तात्काळ बंद करणे.३. कयाधू नदी वळून जाणाऱ्या ठिकाणा,पासून खाली (कळमनुरी च्या दिशेने )कयाधू नदीवर शेकडो गावच्या ग्रा.प. चे गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरी नदीवर असून, नदी या नंतर खाली वाहत नसल्याने त्या गावानं पाणी मिळणार नाही,अनेक गावातील शेतांना सुद्धा पाणी मिळणार नाही.४. खरबी या ठिकाणी २ दलघमी बॅरेजेस चे काम चालू असून हा बॅरेजेस करण्यास कुठलाही विरोध नाही.असेच कयाधू नदीवर सर्वत्र उगमस्थान पर्यंत १०ते१२ बॅरेजेस मंजूर करून बांधावे. हिंगोली व सेनगाव तालुक्यातील शेतीला पाणी उपलब्ध करावे ही प्रमुख मागणी आहे. ५.कयाधू नदी वळवणे नियम बाह्यच आहे ते असे की,कयाधू नदी नॉर्मल झोन मध्ये मोडते पाणी उपलब्धता ३११९ घन मीटर/हेक्टर असून,ज्या नदीची पाणी उपलब्धता (जल उपलब्धता ८००० घन मीटर/हेक्टेयर ) असेल तरच त्या नदीचे पाणी दुसरीकडे वळवता म्हणून कयाधू नदीचे चोरून भूमिगत पाणी नेणे तत्काळ रद्द करा. ६.भूमिगत बोगदा साठी १६१हेक्टर जमीन लागणार आज जमीन संपादित न करता शेतकऱ्यांवर दापदडप करून काम चालू या मुळे तत्काळ कयाधू नदी चोरून जाणारा बोगदा तत्काळ काम बंद करा.

हिंगोली जिल्यातील सर्व आजी, माजी खासदार,आमदार, जी.प. आणि प. स. सदस्य, सरपंच, सदस्य, सर्वच पक्ष संघटना जिल्यातील शेतकरी शेतमजूर बांधव,यांनी दि.२४मार्च२६ रोजी बैठकी ११ शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे चर्चा करून १२ वाजता जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देण्यास उपस्थित राहावे असे आव्हान शेतकरी नेते डॉ.रमेश शिंदे व कयाधू नदी बचाव संघर्ष समिती. हिंगोली जिल्हा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# दु:खमय संसारात खरे सुख नाही, नित्यानंदाचा मार्ग भक्तीतच

## भाईश्री रमेशभाई ओझ्मा यांचे प्रभावी प्रतिपादन: कथेचा चौथा दिवस

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** संसारात सर्वत्र दुःख असताना आपण त्यालाच सुख समजतो, हीच माणसाची मोठी चूक आहे, असे परखड विचार मांडत प.पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांनी श्रीमद भागवत कथेतून जीवनाचे गूढ उलगडले.

येथील रामलीला मैदानावर रविवारी चौथ्या दिवशी कथेला सुरुवात होण्यापूर्वी मुख यजमान श्री नंदकिशोर शर्मा तर दैनिक यजमान म्हणून रमेश चंद्र सावरमल बगडिया, पदमाबाई शिंदे, नवनीत राठोर यांच्या वतीने ग्रंथाची पूजा अर्चना करण्यात आली. त्यानंतर भजन गात कथेला सुरुवात झाली.

भाईश्री पुढे म्हणाले की, संसारात दिसणारे सुख हे अनित्य आहे. परिवारात अशांतता, कलह आणि तणाव निर्माण होणे हीच संसाराची खरी ओळख आहे.

तरीही माणूस या दुःखमय अवस्थेलाच सुख समजून त्यात अडकून राहतो. त्यानंतर भाईश्री यांनी दोह्याच्या माध्यमातून 'नित्यानंद' या शाश्वत आनंदाचा अनुभव स्पष्ट केला. "जो आनंद सिंधू सुखराशी" या ओवीतून त्यांनी सांगितले की, खरा आनंद हा बाह्य वस्तूंमध्ये नसून अंतर्मनात आणि सद्गुरूंच्या मार्गदर्शनात आहे. सद्गुरूच माणसाला योग्य दिशा दाखवतात, असे त्यांनी अधोरेखित केले.

कर्ममार्ग आणि भक्तीमार्ग यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणाले की, कर्ममार्गावर चालणाऱ्या व्यक्तीला सुख हवे असते, तर भक्तीमार्गातील व्यक्तीला 'आनंद' हवा असतो. स्वर्गातील सुख उच्च असले तरी तेही अनित्यच आहे, मात्र भक्तीतून मिळणारा आनंद नित्य आणि शाश्वत असतो. जीवनातील विषमता मांडताना त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, "एखादा माणूस झोपडीत जन्म घेतो तर दुसरा श्रीमंत घराण्यात का?" याचे उत्तर देताना त्यांनी कर्मसिद्धांत स्पष्ट करत प्रत्येकाच्या जीवनातील परिस्थिती ही त्याच्या कर्मांवर आधारित असल्याचे सांगितले. भागवत कथा हीच माणसाला योग्य मार्ग दाखवणारी आहे, असे सांगत त्यांनी प्रथम स्कंधातील धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचे



सविस्तर विवेचन केले.

यावेळी मौनी बाबांच्या कथेद्वारे खोट्या साधूंचा पर्दाफाश करत त्यांनी सांगितले की, काही लोक केवळ वेशभूषा आणि दिखावा करून लोकांना फसवतात व पैशावर डल्ला मारतात. त्यामुळे खऱ्या आणि खोट्या साधूंमध्ये फरक ओळखणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भागवत कथेतून दिलेल्या या जीवनमूल्यांनी उपस्थित भाविकांना आत्मचिंतनाचा नवा दृष्टिकोन दिला. यावेळी हजारो भविकांनी कथेचा लाभ घेतला. रात्री कृष्ण जन्म सोहळा पार पडला.




# अर्थसंकल्प बाबतीत हिंगोली येथे भारतीय जनता पक्षाची पत्रकार परिषद, आमदार केणेकर यांनी साधला संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली येथे भारतीय जनता पक्ष हिंगोली जिल्हा यांच्या वतीने पत्रकार परिषद चे भाजपच्या कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्राच्या विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची प्रत सादर करण्यात येऊन व त्यातील महत्त्वाच्या तरतुदींचे सविस्तर विवेचन करण्यात आमदार संजय केणेकर यांनी करीत पत्रकारांशी संवाद साधला.

या प्रसंगी आमदार संजय केनेकर नोंदणी प्रमुख, मराठवाडा पदवीधर मतदारसंघ,आमदार प्रज्ञाताई सातव, जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर भाजपा युवा मोर्चाचे माजी जिल्हाध्यक्ष पप्पूभाऊ चव्हाण, शशिकांत वडकुते, मिलींद यंबल, रजनीश पुरोहित आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बिगर राजकीय, निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्ती करावी पायल बुलबुले यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर बिगर राजकीय व निवृत्त आयपीएस (आयपीएस) अधिकारी महिलांची नियुक्ती करावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्त्या पायल बुलबुले यांनी केली आहे. महिलांना निष्पक्ष व तटस्थ न्याय मिळण्यासाठी हा निर्णय अत्यंत गरजेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



आजपर्यंत महिला आयोगाच्या अध्यक्षपदी बहुतांश वेळा राजकीय पार्श्वभूमी असलेल्या महिलांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाशी संबंधित व्यक्ती, तसेच काही वेळा राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांनाही संधी देण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळाले. या नियुक्त्यांमुळे आयोगाच्या कामकाजावर राजकीय प्रभाव पडत असल्याची चर्चा वारंवार होत असते.

काही प्रकरणांमध्ये पोलिसांवर दबाव आणला जात असल्याचेही सांगितले जाते. परिणामी, पीडित महिलांना न्याय मिळण्याऐवजी त्यांच्यावर अन्यायच होत असल्याच्या तक्रारी समोर येत असल्याचे पायल बुलबुले यांनी नमूद केले. त्यामुळे या पदावर राजकीय व्यक्तीऐवजी निष्पक्ष, प्रामाणिक आणि कायदा व सुव्यवस्थेचा अनुभव असलेल्या निवृत्त आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, "महिला आयोग हे महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणारे अत्यंत संवेदनशील व्यासपीठ आहे. येथे कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप असू नये. जर आयोगावर विश्वास ठेवायचा असेल, तर अध्यक्षपदावर अनुभवी आणि निष्पक्ष अधिकारी असणे अत्यंत गरजेचे आहे."

राज्यात महिला सुरक्षेचे प्रश्न वाढत असताना महिला आयोगाची भूमिका अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने तातडीने योग्य निर्णय घेत, बिगर राजकीय आणि सक्षम महिला अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५.२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून




सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

आज हिंगोली जिल्ह्यातील आजेगाव, सिंदफळ, थोरवा, हयातनगर, रिधोरा, हट्टा, आरळ, साखरा, बालेगाव, हिवरखेडा आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.


हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जिजाऊ ब्रिगेडचे ३ एप्रिल रोजी मुंबई येथे राज्य महाअधिवेशन

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** महिलांचे सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे.





या अधिवेशनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत तसेच प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार असून या अधिवेशनातील वैचारिक प्रबोधनाचा व सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील,जिल्ह्यातील तसेच शहरातील महिलांनी उपस्थित राहण्याचे आव्हान जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर व जिल्हाध्यक्ष प्रियंका चिखलीकर भोयर यांनी केले आहे.

हे महाअधिवेशन एकूण चार सत्रामध्ये पार पडणार असून उद्घाटन म्हणून मुंबई महानगरपालिकेच्या महापौर शिवमती रितूताई तावडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा शिवमती सीमाताई बोके असणार आहेत. कार्यक्रम स्थळी विविध सुप्रसिद्ध वक्ते यांचे मार्गदर्शन लाभणार असून अधिवेशनस्थळी जिजाऊ ब्रिगेडच्या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे. या अधिवेशनासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड पुरुषोत्तम खेडेकर, शिवधर्म संसद सदस्य शिवमती रेखाताई खेडेकर तसेच मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष इंजि.विजय घोगरे, राज्य कार्याध्यक्ष शिवश्री नवनाथ घाडगे,प्रदेश महासचिव चंद्रशेखर शिखरे, जिजाऊ ब्रिगेड महासचिव स्नेहाताई खेडेकर, आंतरराष्ट्रीय अध्यक्षा मयुराताई देशमुख, राष्ट्रीय अध्यक्ष निर्मलाताई पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या अधिवेशनासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्ष अंजलीताई भोसले, मुंबई अध्यक्ष स्मिता देसाई, नवी मुंबई अध्यक्ष भारतीताई पाटील, महासचिव सरिताताई सोमवंशी, कार्याध्यक्ष मनीषाताई देसाई, ठाणे जिल्हाध्यक्ष सुनिताताई पाटील व मुंबईची सर्व टिम अथक परिश्रम घेत आहेत. तरी या अधिवेशनाला हिंगोलीला जिल्ह्यातून जास्तीत जास्त महिलांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रियंका चिखलीकर भोयर यांनी केले आहे.

# बहुजन समाज पार्टीच्या हदगाव विधानसभा अध्यक्षपदी साहेबराव नरवाडे यांची निवड

## विधानसभा प्रभारी पदी आर.व्ही.वाठोरे व विजयकुमार भरणे यांची निवड

*** आत्ताच एक्सप्रेस**
**गजानन जिदेवार आष्टीकर**

**हदगांव –** बहुजन समाज पार्टीच्या हदगाव, हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाची नवीन कार्यकारणी ची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाअध्यक्ष सुभाष भोकरे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व चंद्रप्रकाश देगलूरकर प्रदेश कार्यकारणी सदस्य यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये दिनांक १९/०३/२०२६ रोजी हदगाव येथील शासकीय विश्रामगृहामध्ये पार पडली. या महत्वपूर्ण बैठकीमध्ये बहुजन नायक मान्यवर कांशिरामजी साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर हदगाव विधानसभा अध्यक्षपदी तरुण युवा नेतृत्व साहेबराव नरवाडे अंबाळकर यांची निवड करण्यात आली.

नवीन कार्यकारणी मध्ये विधानसभा प्रभारी पदी आर. व्ही वाटोरे दुसरे प्रभारी विजयकुमार सोपानराव भरणे,विधानसभा अध्यक्ष साहेबराव नरवाडे, विधानसभा महासचिव पदी धम्मपाल मुनेश्वर,




बिव्हीएफ. संयोजक संदीप रायघोळ, हदगाव विधानसभा उपाध्यक्षपदी गुलाबराव दवणे, आदींची निवड करण्यात आली. ही निवड प्रक्रिया प्रदेश कार्यकारणी सदस्य चंद्रप्रकाश देगलूरकर नांदेड जिल्हा अध्यक्ष सुभाषजी भोकरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मायाताई पाटील,जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे, जिल्हा कोषाध्यक्ष सखाराम मामा हिंगोले जिल्हानेते गणेश राऊत,माजी विधानसभा अध्यक्ष सुनील कांबळे यांच्या उपस्थितीत पार पडली यावेळी. जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे साहेब यांनी आपल्या मनोगतात असे सांगितले की, पक्ष वाढीसाठी सर्वांनी एकत्र येऊन पक्ष कसा वाढेल,व गाव तिथे शाखा कशी तयार होईल याकडे सर्वांनी लक्ष द्यावे. सर्व नवीन पदाधिकाऱ्यांनी आपापली जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडावी. एकमेकांना सहकार्य करावे असे आवाहन केले. आर. व्ही. वाठोरे यांनी मान्यवर कांशिरामजी साहेब यांच्या जिवनावर गित गाऊन बैठकीची सांगता करण्यात आली.

# दाभाडी-दरसांगवी रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात; ग्रामस्थांकडून लक्ष्मीकांत मुंडे यांचा सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला दाभाडी ते दरसांगवी हा रस्ता दाभाडी, दरसांगवी आणि टिंगनवाडी या तीनही गावातील नागरिकांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरत होता. अनेक वेळा संबंधित विभागाला निवेदने देऊनही या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.

दरम्यान, दिनांक १७ मार्च रोजी मराठी बाणा न्यूजच्या माध्यमातून या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत बातमी प्रकाशित करण्यात आली. या बातमीची तात्काळ दखल घेत आमदार भीमराव केराम यांच्या सूचनेनुसार कंत्राटदारांनी अखेर दि. २२ मार्च रोजी रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. त्यामुळे तीनही गावांतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर दाभाडी व दरसांगवी ग्रामस्थांच्या वतीने मराठी बाणा न्यूजचे संपादक लक्ष्मीकांत मुंडे यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. स्थानिक समस्यांना वाचा फोडून प्रशासनाला जागे करण्याचे कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून प्रभावीपणे पार पाडल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे माजी उपसभापती गजानन कोल्हे, पाटील परमेश्वर कदम, दरसांगवीचे उपसरपंच अनिल डुडुळे, दाभाडीचे सरपंच अरविंद कदम, ओमप्रकाश नरवाडे, नागनाथ कदम, श्यामसुंदर कदम, उमाकांत शेलार, शेख गुड्डू, प्रल्हाद शिंदे, किशन कोल्हे, देवराव लांबाटे, बालाजी लांबाटे, जयवंतराव देवठाणकर, संदीप वाठोरे, संतोष ठाकूर, ज्ञानेश्वर चव्हाण, शिवराज दिवटानकर, अनिल मेश्राम (वरिष्ठ तंत्रज्ञ, एमएसईबी), राम बोंगाडे, गणेश तरटे, जनार्दन साळुंखे यांच्यासह दाभाडी व दरसांगवी येथील असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





एकूणच, स्थानिक प्रश्नांना माध्यमातून वाचा फोडल्यास प्रशासनालाही तत्काळ जाग येते, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.

# किनवटमध्ये भाजपचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – भारतीय जनता पार्टी किनवट उत्तर व किनवट शहर मंडळाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय महा अभियान २०२६ अंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन व्ही.आर. गार्डन, सुभाष नगर, किनवट येथे दि. २१ व २२ मार्च २०२६ रोजी उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन किनवट-माहूर विधानसभेचे आमदार मा. भीमरावजी केराम यांच्या हस्ते झाले.





या प्रशिक्षण शिबिराच्या पहिल्या दिवशी विविध विषयांवर मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या सत्रात आमदार भीमराव केराम यांनी मार्गदर्शन केले, तर अध्यक्षस्थानी शिवराज राघू मामा होते. दुसऱ्या सत्रात जिल्हाध्यक्ष नांदेड उत्तर ॲड. किशोर देशमुख यांनी विचार मांडले, अध्यक्षस्थानी व्यंकटराव नेमान्निवार होते. तिसऱ्या सत्रात नागोराव भांगे पाटील यांनी मार्गदर्शन केले, तर अध्यक्षपद श्री बिभीषण पाळोदे यांनी भूषविले. दिवसभरातील सत्रांनंतर भोजन, निवासी व्यवस्था व सांस्कृतिक कार्यक्रमांचीही आकर्षक मांडणी करण्यात आली. दुसऱ्या दिवशी सकाळी श्री अखिल खान सर व मनसब योग केंद्राच्या प्रशिक्षकांमार्फत योगासन सत्र घेण्यात आले. त्यानंतर चौथ्या सत्रात श्री रामराव भालेराव यांचे मार्गदर्शन झाले, अध्यक्षस्थानी यशवंतराव पाटील कराळे होते. पाचव्या सत्रात राघू मामा यांनी मार्गदर्शन केले, अध्यक्षपद सौ. पूनम दीक्षित यांनी सांभाळले. सहाव्या सत्रात श्री जीवन अग्रवाल यांनी विचार मांडले, अध्यक्षस्थानी श्री दिनकर चाडावार होते. शेवटच्या समारोप सत्रात संजयजी कोडगे यांनी मार्गदर्शन केले, तर अध्यक्षस्थानी आमदार भीमराव केराम होते. प्रत्येक सत्रात मान्यवरांनी कार्यकर्त्यांना संघटन बळकटीकरण, विचारधारा आणि कार्यपद्धती यावर सखोल मार्गदर्शन केले. या शिबिरादरम्यान विविध विषयांवरील प्रदर्शनीही आयोजित करण्यात आली होती. प्रशिक्षणाची सुरुवात महाराष्ट्र गीत व वंदे भारत गीताने, तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मंडळ अध्यक्ष उमाकांत पाटील कराळे व किनवट शहर मंडळाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी केले. सूत्रसंचालन श्री विश्वास कोल्हारीकर सर यांनी केले.

# उमरीत प्रभाग ०३ मध्ये कवळे गुरुजींकडून स्वखर्चातून बोअर; पाण्याचा प्रश्न मार्गी

*** आत्ताच एक्सप्रेस**
**सुमन पोलशेटवार**

**उमरी** – शहरातील प्रभाग क्रमांक ०३ मध्ये नागरिकांच्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कवळे गुरुजी यांनी स्वखर्चातून बोअर मारून पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे निवडणुकीदरम्यान दिलेला शब्द पूर्ण करत त्यांनी हा उपक्रम राबविल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



प्रभागातील नागरिकांनी दीर्घकाळापासून पाण्याच्या समस्येबाबत मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर ''सत्ता असो वा नसो, जनतेची सेवा थांबत नाही,'' हा संदेश देत कवळे गुरुजी यांनी स्वतःच्या खर्चातून बोअर मारून मोटार बसवून पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

या कामाचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. यावेळी जेष्ठ नेते विजयकुमार उत्तरवार, माजी नगराध्यक्ष संजयजी कुलकर्णी, किशोरभाऊ पबीतवार, वसंत जाधव, संदीपभाऊ, लुटके, उत्तम आयेवार, गणेश सबनेवाड यांच्यासह प्रभागातील अनेक नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमामुळे प्रभागातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असून नागरिकांनी कवळे गुरुजींच्या या कामाचे स्वागत केले आहे.

# बोधडी येथे आज भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर; तज्ज्ञ डॉक्टरांचा ताफा येणार

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**बोधडी (बु)**– राम नवमी, भगवान महावीर जन्मोत्सव, रमजान ईद आणि गुढीपाडवा या पवित्र सणांच्या औचित्याने तसेच सांगाळे हॉस्पिटलच्या नूतन वास्तूतील स्थलांतराच्या निमित्ताने आज सोमवार, दि. २३ मार्च २०२६ रोजी बोधडी येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिबिराचे आयोजन सांगाळे हॉस्पिटल, बोधडी (बोधडी सर्कलजवळ) येथे सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत करण्यात आले आहे. या शिबिरात विविध आजारांवर मार्गदर्शन व उपचारासाठी नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती राहणार आहे.

या शिबिरात डॉ. झुबेरी (शल्य चिकित्सक), डॉ. मारोती वाकोडे (हृदयरोग व मधुमेह तज्ज्ञ), डॉ. संजय धुमाळे (नेत्ररोग तज्ज्ञ), डॉ. अक्षय गौड (मुळव्याध व भगंदर तज्ज्ञ), डॉ. संकेत नाखले (त्वचारोग तज्ज्ञ), डॉ. अमोल मेटांगळे (वातरोग तज्ज्ञ), डॉ. व्यंकट सांगाळे (चिकित्सक व सल्लागार) तसेच डॉ. कुणाल चव्हाण (बालरोगतज्ज्ञ) हे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

शिबिरादरम्यान रक्त व लघवी तपासणीवर ५० टक्के सवलत देण्यात येणार असून ही सेवा फोले क्लिनिकल लॅबोरेटरी यांच्या सहकार्याने उपलब्ध करून दिली जाणार आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब, पॅरालिसिस यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वेळेत निदान व योग्य उपचारासाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे.

''हृदयरोग, अस्थमा, पोटाचे विकार आणि किडनीशी संबंधित समस्या असलेल्या रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा व वेळेत उपचार घ्यावेत,'' असे आवाहन डॉ. मारोती वाकोडे (मनस्वी हॉस्पिटल, हिमायतनगर) व डॉ. व्यंकट सांगाळे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी माधव फोले (मो. ७७२०८००३७६ / ७३८७५१६१०९) यांच्याशी संपर्क साधावा.


# 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत उमरीत भव्य 'रन फॉर वसुंधरा' मॅरेथॉन उत्साहात

*** आत्ताच एक्सप्रेस**
**सुमन पोलशेटवार**

**उमरी** – माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत उमरी नगर परिषद, जि. नांदेड यांच्या वतीने शहरात 'रन फॉर माझी वसुंधरा ६.०' या महा मॅरेथॉन स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत उमरी शहरातील नागरिक, विद्यार्थी आणि विविध घटकांतील स्पर्धकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष शकुंतला भगवान मुदिराज, उपाध्यक्ष कैलास श्रीनिवासराव देशमुख गोरठेकर, मुख्याधिकारी गणेश चाटे, नगरसेवक प्रविणभाऊ सारडा, वैद्यकीय अधीक्षक अर्जुन शिंदे, पोलीस उपनिरीक्षक आरमाळ साहेब, पोलीस पाटील दत्तात्रय वारेवार, विष्णु अट्टल, गटनेते राजेश जाधव, नगरसेवक साईनाथ जमदाडे, प्रतिनिधी शंकर शिंदे, नगरसेवक संदीप चंदनवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय नगर परिषद प्रशासनातील अधिकारी व कर्मचारीकार्यालयीन अधीक्षक कांचन पडलवार, नगर अभियंता कैलाश येमेलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता विनोद सावंत, रचना सहाय्यक पूजा पावडे, वरिष्ठ लिपिक गणेश मदने, सचिन गंगासागरे, सत्यनारायण पिंडकुरवार, लिपिक सूर्यकांत माळवतकर, गंगाधर पवार, शंकर पाटील, पंडित जाधव, रमाबाई करपे, शंकर माने तसेच मुकादम चंद्रकांत श्रीकांबळे, आकाश खंदारे, पिराजी गायकवाड, नरेंद्र खंदारे, शकील पठाण, अंकुश सवई, माणिक पेंडकर, मिलिंद सवई, बालाजी खंदारे, शहनाज





बेग, सुनंदा खंदारे, मिरा सोनकांबळे, मीना लिंबे, मीरा चौदंते, हमीद बेग, सुरेश मुदिराज, माधव जाधव, सदानंद गायकवाड आदी घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

या मॅरेथॉनमुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमाला शहरातील नागरिक, विद्यार्थी तसेच पुणे येथील पत्रकारही उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन उमरी नगर परिषद कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक गणेश मदने यांनी केले.

# बिलोलीत पहिल्यांदाच मे महिन्यात होणार मन्नेरवारलू वधू वर परिचय मेळावा

## सकल मन्नेरवारलू जमातीचा जिल्हास्तरीय उपवधू-वर परिचय मेळावा; तेलंगणा राज्यातील वधू वर उपस्थित राहणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिलोली** – मे महिन्यात बिलोलीमध्ये एक मोठा जिल्हास्तरीय मन्नेरवारलू वधूवर परिचय मेळावा आयोजित केला जाणार आहे. बिलोलीतील मन्नेरवारलू समाजातील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांच्या संकल्पनेतून बिलोली मध्ये प्रथमच समाजातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय मेळाव्याचं आयोजन होणार आहे. ज्यात वधू-वरांची एकमेकांना परिचय करुन देण्याची संधी मिळणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी केले आहेत.

या मेळाव्यात विशेषतः समाजाच्या विविध घटकांच्या वधू-वरांचा सहभाग होईल. तेलंगणा राज्यातील वधू वर उपस्थित राहणार असून दोन राज्यातील नाते अधिक घट्ट होणार असल्याचे सांगितले आहेत. अशा प्रकारचे परिचय मेळावे विवाहाच्या योग्य जोडीदाराची निवड करण्यास मदत करतात. यामध्ये अनेक परिवार आपले इच्छित वधू-वर शोधण्यासाठी एकत्र येतील. सर्व समाज बांधवांचे योगदान व सहकार्याने नांदेड जिल्ह्यातून उपवधू – वर नोंदणीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यासाठी मन्नेरवारलू समाजातील सर्व शिक्षित, उच्चशिक्षितांसह विविध क्षेत्रातील मुला मुलींना अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी त्यांच्या पालकांनी विवाह इच्छुकांच्या परिचय पत्रासह पूर्व नोंदणी बिलोली शहरातील अनेक ठिकाणी नोंदणी करता येणार असल्याचे आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी म्हटले आहेत.

जिथे उच्चशिक्षित आणि अनुरूप जोडीदार शोधण्यासाठी उपवर-वधू व पालकांना एकाच व्यासपीठावर संधी मिळते. २०२६ या वर्षासाठी नाव नोंदणी सुरू आहे आणि अशा मेळाव्यांमध्ये जातीच्या पोटजाती, वडिलोपार्जित मुळे व शिक्षणानुसार स्थळे शोधणे सोपे होते. वधू-वर परिचय मेळावा हे विवाह इच्छुक तरुण-तरुणी आणि त्यांच्या पालकांसाठी प्रत्यक्ष भेटून स्थळे पाहण्याचा, ओळख करून घेण्याचा आणि नाते निश्चित करण्याचा एक उत्तम व्यासपीठ आहे. नाव नोंदणी केल्यानंतर उपवर वधूची माहिती असलेली उपयुक्त पुस्तिका मेळाव्याच्या दिवशी देण्यात येईल.

नाव नोंदणी करण्यासाठी सागर सुरोड यांचे श्री साई मोबाईल शॉप्पी, जुना बस स्टॅन्ड जवळ, बिलोली आणि नागेश कसलोड यांचे गुरु माऊली मल्टि सर्व्हिसेस, जुन्या पंचायत समितीच्या बाजूला, बिलोली तसेच संदीप पुपुलवाड यांचे ओमसाई ऑनलाईन सेवा केंद्र, तहसीलच्या गेटजवळ, बिलोली या ठिकाणी नाव नोंदणीसाठी फॉर्म ठेवले असून त्या ठिकाणी फॉर्म भरायचे आहे.

वधु वर परिचय मेळावा घेणे सध्या काळाची गरज आहे. जेणेकरून लोकांना स्थळ शोधण्यासाठी बराच खर्च करावा लागतो, अशाप्रकारे परिचय मेळाव्याच्या आयोजनामुळे गोरगरीब लोकांचा खर्च वाचून जाईल आणि चांगले स्थळ त्यांना भेटून जाईल.

तसेच उपवर वधूंनी नाव नोंदणी, जाहिराती, देणगी, शुभेच्छा देण्यासाठी ८८८८०८७५१३ या नंबरचा वापर करावा. मन्नेरवारलू समाजातील इच्छुक दानशूर बांधवांनी या कार्यास आर्थिक मदत देखील या नंबरवरच करावी तसेच अधिक माहिती मिळवायची असल्यास संबंधित आयोजक लक्ष्मीकांत कलमुर्गे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# किनवटमध्ये जेष्ठ पत्रकारास उघड धमकी; गुन्हा दाखल, परिसरात खळबळ

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – बातमी प्रसिद्ध केल्याचा राग मनात ठेवून एका जेष्ठ पत्रकाराला उघडपणे जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक घटना किनवट येथे घडली आहे. या प्रकरणी आरोपी अजय संजय कदम याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(२) व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७:३५ वाजण्याच्या सुमारास किनवट तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व दैनिक श्रमिक एकजूटचे जेष्ठ पत्रकार फ ुलाजी गरड पाटील हे पोलीस स्थानकाच्या आवारात उपस्थित होते. यावेळी आरोपी अजय कदम याने त्यांना अडवून आक्रमक पवित्रा घेत ''माझ्या वडिलांची बातमी कशी काय लावलीस? तुला बघून घेतो, तुझे बाहेर फिरणे बंद करतो, पाय तोडतो, तुला सोडणार नाही,'' अशा शब्दांत जीवे मारण्याची धमकी देत दमदाटी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेमागील पार्श्वभूमीही गंभीर आहे. आरोपीचे वडील संजय चंपतराव कदम यांच्या विरोधात यापूर्वी किनवट पोलीस स्थानकात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. त्या एफआयआरच्या आधारे पत्रकार पाटील यांनी संबंधित बातमी प्रसिद्ध केली होती. याचाच राग मनात धरून आरोपीने थेट पोलीस ठाण्याच्या आवारातच धमकी दिल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, शिवजयंतीच्या दिवशीही अशाच प्रकारे धमकावण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर किनवट पोलीस स्थानकात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल श्रीमनवार करीत आहेत.

दरम्यान, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो; मात्र अशा प्रकारच्या घटनांमुळे या स्तंभावरच दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे चित्र समोर येत आहे.

निर्भीड पत्रकारितेची किंमत धमक्या आणि दडपशाहीच्या स्वरूपात चुकवावी लागत असल्याची वस्तुस्थिती पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र व प्रभावी कायद्याची मागणी वारंवार होत असताना, अशा घटना रोखण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813